# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०७/०८/२०१९

## दि.०६/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३६३/१९,भादविक ३५४,३२४,३२३,५०४,१४३,१४४,,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२० वर्षे,रा.गुलटेकडी,पुणे |
| **आरोपी** | तीन इसम व दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०१९ रोजी १९/०० वा.फिर्यादी यांचे दुकाना समोर ४२७,इंदीरानगर,गुलटेकडी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहात्या घरा जवळील त्यांचे जनरल स्टोअर्सचे दुकान उघडण्या करिता गेले असता,नमुद इसमापैकी एक इसम हा दुकानाच्या शटरला पाठ लावून उभा असल्याने,त्यास बाजूला सरक असे म्हणताच,त्याने त्यांचेवर यापुर्वी गुन्हा दाखल केल्याचा राग मनात धरुन,त्याचे इतर साथीदारांनी तलवारी काढुन इथला मीच भाई असे म्हणुन फिर्यादी यांचा विनयभंग करून,त्यांना शिवीगाळ करुन,सदर ठिकाणी दहशत निर्माण केल्याने,तेथील लोकांनी घाबरुन त्यांचे दरवाजे खिडक्या बंद केल्या. त्यानंतर फिर्यादी यांचे आईला नमुद महिला यांनी हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली. तसेच फिर्यादी यांचे भाऊ याचे डावे हातावर तलवार मारुन,त्यांना हाताने मारहान करुन,फिर्यादी यांचे वडिलांच्या हातावर मनगटा जवळ तलवारीने वार करून त्यांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जे.बी.बोरसे ८३८००८९७११ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३६५/१९,भादविक ३०७,३२६,३२४,३२३,५०४,१४३,१४४,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | अम्मार शेख,वय-२४,रा.सैय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | तीन महिला व दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०१९ रोजी १९/०० वा. ४२७,इंदीरानगर,गुलटेकडी,पॉवर हाऊस मागे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे एकमेकांचे नातेवाईक असुन,ते एकाच परीसरात राहण्यास आहेत. फिर्यादी व नमुद इसम व महिला यांचेमध्ये पुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरुन त्यांनी गैर-कायदयाची मंडळी जमा करुन,फिर्यादी यांची पत्नी यास्मिन व मुलगा फैजल या दोघांना शिवीगाळ व मारहाण करीत असताना,फिर्यादी हे मध्ये पडल्याने एका इसमाने फिर्यादी यांचे डोक्यात व गालावर तसेच फैजल याचे हातावर नारळ सोलण्याच्या सत्तुराने मारहाण करुन,त्यांना गंभीर जखमी करुन,जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जे.बी.बोरसे ८३८००८९७११ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६८७/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | राजेंद्र ननावरे, पो.ना. कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | राजु रामराव कागणे,वय-३५ वर्षे,रा.येवलेवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०८/२०१९ रोजी १२/३० वा. व्हि.आय.आय.टि.कॉलेज समोर हागवणेनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार अर्णव अजय राहिरकर,वय-२०,रा.एरंडवणा,पुणे याचे डोक्यावरून डंपरचे चाक घालुन,त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. पी.पी.डोईफोडे ९५५२५५२९०१ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ६८५/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला,वय-३४,रा.महमदवाडी,पुणे

**आरोपी** अज्ञात मोबाईलधारक व्यक्ती (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२०/०७/२१९ रोजी १८/०० वा. फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक व्यक्तीने फिर्यादी यांना फोन करून,मी एसबीआय बँकेतुन बोलत आहे,तुम्हाल बिग बाजार कंपनीची ५ हजार रूची ऑफरी आहे असे सांगुन,त्यांचेकडुन क्रेडीट कार्डचे शेवटचे चार अंक घेवुन,ओटीपी नंबर शेअर्स करण्यास सांगुन,फिर्यादी यांचे क्रेडीट कार्डावरून १,४७,०००/- रूची अर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे), एम.एस.कुंभार ८१०८००५५३७

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** लष्कर पो स्टे ३०३/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक पुरूष,वय-२६ वर्ष,रा.कॅम्प,पुणे

**आरोपी** अज्ञात मोबाईल व ई-मेल आयडी तसेच बँकेचा खातेधारक व्यक्ती (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१०/०६/२०१९ ते दि.०८/०७/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरातुन मोबाईलद्वारे

**तपशिल** यातील नमुद अज्ञात मोबाईल व ई-मेल आयडी तसेच बँकेचा खातेधारक व्यक्ती यांनी फिर्यादीस फोन करून,त्यांना ऑस्ट्रेलीया मधील कंपनी एस.जी.पी.टी.वाय. लिमी.या कंपनी मध्ये सेल्स मॅनेजरची नोकरी देण्याचे अमिष दाखवुन,त्यांना वेळोवेळी वेग-वेगळे मेल करून फिर्यादी यांना त्यांचे बँकेचे खात्यावर एकुण २८,२००/- रूपये भरावयास लावुन,फिर्यादी यांना नोकरी न देता,त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे), एम.डी.देवरे ९९२३१०७४७१

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** फरासखाना पो स्टे २७३/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** महिराम विष्णोई,वय-५०,रा.सुखसारगनगर,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०५/०८/२०१९ रोजी १७/४० वा. ते १८/०० वा.चे दरम्यान श्री हनुमान स्टोअर्स,९७३, बुधवार पेठ,पुणे येथे सार्वजनिक रोडवर

**तपशिल** यातील फिर्यादी हे चालवित असलेल्या त्यांचे टेम्पो मधुन नमुद ठिकाणी असलेल्या व्यापारांना डिलेव्हरी दिलेल्या मालाचे पैसे घेवुन थांबले होते. त्यावेळी त्यांचे शर्टाचे अंगावर घाण पडलेली असल्याने त्यांनी अंगातील शर्ट काढुन,परत त्यांनी टेम्पोचे चालकाचे केबीन जवळ आले असता,त्यांनी सदर ठिकाणी निळया रंगाचे बॅग मध्ये ठेवलेली १९,८६७/- रूपये रोख रक्कम ही कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरून नेली आहे.

**त.अंमलदार** पो.हवा. के.आर.कदम ९९२३६९५३७२

## दि.०७/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ५४४/१९,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** एक महिला,वय-४५,रा.वडगांव-शेरी,पुणे

**आरोपी** मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०८/२०१९ रोजी २३/३० वा. आयडीबीआय बँके समोर येरवडा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया त्यांचे पतीसह दुचाकीवरून जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे गंठण ४२ हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. मंगेश भांगे ८८०५३३३०३३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७५६/१९,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ३(२५) |
| **फिर्यादी** | प्रशांत गायकवाड, पो.ना. हडपसर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.प्रमोद सुभाष शिंदे,वय-२७,रा.गल्ली नं.७,ससाणेनगर,हडपसर,पुणे २.शेखर सुरेश गायकवाड,वय-३५,रा.देवाची उरूळी,पुणे ३.शोएब मजीद शेख,वय-१९,रा. भेकराईनगर, फुरसुंगी,पुणे ४.देवीदास घनशाम पवने,वय-२१,रा.काळेपडळ,हडपसर,पुणे ५. निखिल रविंद्र वाघमारे,वय-१९,रा.शेवाळवाडी,मांजरी,जि.पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०८/२०१९ रोजी ००/०५ वा. मंतरवाडी फाटया जवळ कपडयाचे गोडावुनचे पाठीमागील मोकळया जागेत फरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे लोखंडी कोयते,एक कटावणी, एक कटर,एक्साब्लेड,स्क्रु-ड्रायव्हर,मिरची पुड व नायलॉनची दोरी इत्यादी घातक शस्त्रे असा एकुण १,०१०/- रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन, हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,अंधा-या मोकळया जागेत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना सहा इसमांपैकी अ.क्र.१ ते ५ हे मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. तुषार पाचपुते ९९७५७५८९८९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**